स्थापना

।। श्री दत्त प्रसन्न ।।

1987




30 वा

# वार्षिक अहवाल 2016-2017

पश्चिम उपनगरातील अग्रेसर पतपेढी

# दत्तसेवा

## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

रजि. नं. बी.ओ.एम./डब्ल्यू.पी./आर.एस.आर./(सी.आर.)/११०२/८७.

प्रशासकीय कार्यालय : 1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड, मालवणी अग्निशमन केंद्रासमोर, मालाड (पश्चिम), मुंबई - 400 095.

फोन नं. : 2888 9027/8108160101/113 | Website : www.dattaseva.com

30 वा वार्षिक अ[illegible]
2[illegible]017

# दत्तसेवा
सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई.

## संचालक मंडळ


श्री. आनंदराव ई. माईंगडे
संस्थापक/अध्यक्ष


श्री. गोपीनाथ म. राणे
उपाध्यक्ष


श्री. विनय गो. जोशी
संचालक


श्री. जयवंत ग. पाटील
संचालक


श्री. प्रभाकर ज. धुरी
संचालक


श्री. प्रदिप नि. कदम
संचालक


श्री. अरविंद रा. पाटील
संचालक


श्री. भार्गवदास रा. जाधव
संचालक


श्री. वसंत कृ. पाटील
संचालक


श्री. मोहन नि. कदम
संचालक


श्रीम. शिवगामी उ. पिल्लई
संचालिका


कु. स्नेहा आ. माईंगडे
संचालिका


अॅड. जयसिंग एस. सुर्वे[illegible]
तज्ञ संचालक


श्री. प्रभाकर गो. देसाई
तज्ञ संचालक


श्री. हरी के. पाटील
मुख्यव्यवस्थापक


सौ. अर्चना आ. माईंगडे
उप मुख्यव्यवस्थापक

## 30 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्या. मुंबई या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची 30 वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. 29/07/2017 रोजी सायंकाळी 4.30 वाजता **श्री श्याम सत्संग भवन, महावीर नगर जवळ, एकता नगर, लिंक रोड, ब्लू आर्च बिल्डींग मागे, कांदिवली (प.), मुंबई** - 400 067. येथे खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी बोलविण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

## सभेपुढील विषय

1) दि. 07/08/2016 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2) संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक 31 मार्च 2017 पर्यंतच्या कार्याचा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
3) सन 2016-2017 या सालचा अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
4) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
5) सन 2017-2018 सालाकरिता अंतर्गत व कर लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
6) सन 2017-2018 सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
7) सन 2016-2017 सालातील अंदाजपत्रकाची माहिती देणे व वाढीव अंदाजपत्रकांस मान्यता देणे व सन 2017-2018 सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
8) सन 2016-17 ते 2021-22 या कालावधीकरिता झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणूक निर्णयाची नोंद घेणे.
9) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
10) नवीन शाखा सुरु करण्याबाबत विचार विनीमय करणे.
11) घाटकोपर शाखेकरिता जागा खरेदी करणे.
12) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
13) पोटनियम दुरूस्तीबाबत चर्चा करणे.
14) सन 2015-2016 चा दोषदुरूस्ती अहवाल स्विकृत करणे.
15) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
सही/-
श्री. हरी पाटील
मुख्यव्यवस्थापक

स्थळ : मुंबई
दिनांक : 13/07/2017

---

## विशेष सुचना

1. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी वरील विषयांवर विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
2. ज्या सभासदांना ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकाबाबत लेखी सुचना करावयाच्या असल्यास सभेच्या चार दिवस अगोदर कार्यालयात आणून द्याव्यात. ऐनवेळी आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.
3. सभासदांनी आपल्या राहण्याच्या व कामाच्या पत्त्यातील बदलासंबंधी तसेच फोन नंबर बाबतसंस्थेस त्वरीत कळविण्यात यावे.
4. ज्या सभासदांनी भाग दाखले घेतले नसतील त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयातून कामकाजाच्या वेळेत घेऊन जावेत.
5. सभासदांकरिता प्रशिक्षण बंधनकारक असल्याने वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दुपारी 3 वा. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे यांचेमार्फत सभासद प्रशिक्षण आयोजित केले आहे, तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

संचालक मंडळ

## अध्यक्षांचे मनोगत....



**सन्माननीय सभासद् बंधू भगिनी यांस सस्नेह नमस्कार.....**

दत्तसेवा सहकारी पतपेढीचा 30 वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक आपणा समोर सादर करताना मला आनंद होत आहे.संस्थेच्या स्थापनेपासून आम्ही सर्वसामान्य सभासदांची आर्थिक स्थिती सुधारुन त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध ठेव योजनेअंतर्गत त्यांना बचतीची सवय लावण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांना अडचणीवेळी आर्थिक सहाय्य करण्यासाठी विविध कर्ज योजना राबविल्या. सभासदांना चांगल्या सेवा देण्याकरिता मुंबईच्या पश्चिम उपनगरापासून कोल्हापूर, सांगली, ठाणे जिल्हयापर्यंत 18 शाखा व सुसज्ज प्रधानकार्यालयामार्फत पतपेढीचे संचालक मंडळ, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी अविरत प्रयत्न करत आहोत.

केंद्र सरकारचा नोटाबंदीचा कायदा झाल्याने आर्थिक व्यवहारावर मोठी बंधने आली. बँका व पतसंस्थामधील ठेवी आणि कर्ज हप्त्यांची समिकरणे बिघडली. सामान्य सभासद गोंधळुन गेला तथापि आपल्या संस्थेने त्यांना धीर दिला .सरकारी धोरणांची काटेकोर अंमलबजावणी करून संस्थेचे मार्च 17 अखेर खेळते भागभांडवल **244** कोटी, ठेवी **152** कोटी, कर्ज **130** कोटी व संमिश्र व्यवसाय **283** कोटी झालेला आहे. नोटबंदी असुनही संस्थेची प्रगती झाल्याचे अहवालावरून दिसून येते. ही प्रगती अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी व सभासद,ठेवीदार यांच्यामुळेच झाली आहे हे नमुद करताना आनंद होत आहे.

संस्थेचा सामाजिक कार्याचा वसा अविरतपणे सुरु असून सभासदांच्या मुलांचा शैक्षणिक क्षेत्रामध्ये उत्कृष्ठ गुण मिळविल्याबद्दल तसेच विशेष प्राविण्य प्राप्त केलेबद्दल वार्षिक सभेत गुण गौरव करण्यात येतो.तसेच संस्थेच्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यामध्ये बांबवडे, शेडगेवाडी व तुरुकवाडी येथे शाखा असून सदर शाखेच्या वतीने सभासदांच्या मुलांकरिता वह्यावाटप, वृक्षारोपण, विद्यार्थी गुणगौरव, क्रिडा स्पर्धा असे विविध उपक्रम यशस्वीपणे साजरे केले जातात.

नेहमी आधुनिकतेची कास धरून संस्थेने कोअर बँकींग अंमलात आणल्याने सभासदांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे सोईचे झाले आहे. कॅशलेस या शासकिय धोरणाचा अवलंब करण्यासाठी कार्ड स्वाईप मशिन सुरु करणेत आली आहेत. तसेच भविष्यात ए.टी.एम, इ. योजना कार्यान्वित करण्याचा संस्थेचा मानस आहे.तसेच महिला सबलीकरणासाठी संस्थेने रोजगार व छोटे व्यवसाय करणाऱ्या महिलांना मोठ्या प्रमाणात अर्थपुरवठा केला आहे.

संस्थेने अहवाल सालात उल्लेखनीय प्रगती केल्यामुळे सहकारातील अग्रगण्य संस्था 'बँको'च्या वतीने सन 2016 चा 'बँको पुरस्कार' देऊन संस्थेस सन्मानित केले आहे. तसेच मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने नागरी पतसंस्था गटामध्ये ''सहकार गौरव पुरस्कार 2016'' संस्थेस प्राप्त झाला आहे ही अभिमानाची बाब आहे

आज संस्थेच्या 18 शाखांचा कारभार, प्रधानकार्यालयाच्या नियंत्रणाखाली चालू असून दैनंदिन कामकाजाचा नियमित आढावा घेतला जातो. त्याकरिता प्रशिक्षीत कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी सतत लक्ष ठेऊन असतात. त्यांच्या मेहनतीमुळे आपल्या संस्थेवरील विश्वासामुळे व संचालकांनी केलेल्या सहकार्यामुळे संस्था वर्षागणिक प्रगतीची वाटचाल करत आहे. संस्थेच्या वाटचालीस आपणाकडून या पुढेही असेच सहकार्य व मार्गदर्शन मिळावे हि ईश्वरचरणी प्रार्थना !

**मा. श्री. आनंदराव माईंगडे**
संस्थापक/अध्यक्ष

# अहवाल सालातील विशेष उल्लेखनीय कार्य

**खेळते भागभांडवल :-**

संस्थेने सभासदांना दिलेली दर्जेदार सेवा, सभासदांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास यामुळे संस्थेने 31 मार्च 2017 अखेर 244 कोटी खेळते भागभांडवलाचा टप्पा पूर्ण केला आहे. तर 283 कोटी संमिश्र व्यवसाय पूर्तता केली आहे, ही बाब संस्थेच्या व आपणा सर्वांच्या दृष्टीने विशेष अभिनंदनीय आहे.

**स्वतःच्या मालकीची शाखा कार्यालये :-**

संस्थेचे प्रशासकीय कार्यालय व 18 शाखा सभासदांच्या सेवेशी कार्यरत आहेत. त्यापैकी मालवणी, गोरेगांव(प.), गोराई(प.), जोगेश्वरी (प.), कांदिवली (प.), जोगेश्वरी (पू.), मालाड (पू.), नायगाव(प.), दहिसर(पु.), म्हाडा मालवणी, भांडुप (प.), विरार (पू.) या 12 शाखा संस्थेच्या स्वमालकीच्या असून त्या शाखा अल्पदरात विकत घेतल्या आहेत. आज त्याची किंमत मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. आजच्या बाजारभावाप्रमाणे सुमारे 5,47,95,000.00 एवढी किंमत आहे. यामुळे ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

**मान्यवरांच्या भेटी :-**

अहवाल सालात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयाबरोबर शाखा कार्यालयांना सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामकाजाची पाहणी करून माहिती घेतली त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचे व प्रगतीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले त्याबद्दल संस्था त्यांचे आभारी आहे.

**प्रशिक्षण :-**

सहकार खात्याच्या नियमानुसार पतसंस्थेच्या संचालक व कर्मचारी यांनी 3 दिवस प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. यानुसार संस्थेने खालील प्रशिक्षण कार्यक्रमात आपला सहभाग घेतला असून सर्व संचालक व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले आहे.

1) दि. 11/03/2017 कांदिवली (प.) येथे पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशन व सहकार भारती यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमास संस्थेचे 30 प्रतिनिधी उपस्थित होते.

2) दि. 30/01/2017 ते 31/01/2017 रोजी बँकोच्या वतीने आयोजित खोपोली येथील कार्यक्रमास संस्थेचे 2 प्रतिनिधी उपस्थित होते.

3) दि. 21/01/2017 ते 22/01/2017 कालावधीमध्ये बोर्डी (पालघर) येथील पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशन व सहकार भारती आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमास संस्थेचे 12 प्रतिनिधी उपस्थि होते.

4) दि. 23/12/2016 ते 25/12/2016 या कालावधीमध्ये संस्थेच्या गोराई येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सहकार केंद्र मुंबईच्या सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास संस्थेचे 28 प्रतिनिधी उपस्थित होते.

5) दि. 15/12/2016 रोजी कोल्हापूर जिल्हा सह. बोर्ड व संस्थेच्या वतीने तुरुकवाडी (कोल्हापूर) येथे संस्थेच्या वतीने सहकारी संस्थांचा मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमास सभासद व कर्मचारी असे एकूण 575 प्रतिनिधी उपस्थित होते.

6) दि. 01/06/2016 रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे यांच्या वतीने स्वागत पार्क, मालाड (प.) येथे सभासद प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात 650 सभासद उपस्थित होते.

**सभासद :-**

मागील अहवाल वर्षाअखेर सभासद संख्या 29468 होती. अहवाल वर्षात 6430 नवीन सभासद झाले. त्यामधील 484 सभासदांनी अन्य कारणास्तव राजीनामे दिले. अहवाल वर्ष अखेरीस 35414 कायम सभासद संस्थेच्या पटावर आहेत.

**भाग भांडवल :-**

आपल्या संस्थेचे अधिकृत भागभांडवल ₹ 10 कोटी असून मागील अहवाल वर्षाअखेर संस्थेची भागभांडवल रक्कम ₹ 7,09,63,100/- होती. अहवाल वर्षामध्ये नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून (कर्ज वाटपाच्या प्रमाणात) वसुल झाल्याने भाग रक्कम ₹ 2,04,20,640/- जमा झाले आहेत. काही सभासद स्थलांतरित झाल्याने व राजीनामा दिल्याने ₹ 49,64,840/- चे भाग परत देण्यात आले. अहवाल वर्षाअखेर शिल्लक भागभांडवल ₹ 8,64,18,900/- आहे.

**राखीव व अन्य निधी :-**

अहवाल वर्षाच्या सुरूवातीला राखीव व अन्य निधी रक्कम ₹ 12,53,41,900.60 होता. अहवाल साली ₹ 4,23,53,979.25/- इतक्या तरतूदी करण्यात आल्या असुन ३१ मार्च २०१७ अखेरीस एकूण ₹ 16,76,95,879.85 इतका निधी जमा आहे.

**गुंतवणूक :-**

अहवाल सालाच्या सुरुवातीस अतिरिक्त व राखीव निधी व तरलतेपोटी ₹ 56,52,95,040.15 विविध बँकेमध्ये गुंतवणूक केली होती. संस्थेच्या विविध ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाढ व सहकार आयुक्तांनी लागू केलेले सी. डी. रेशोचे प्रमाण व अतिरिक्त निधी गुंतवणूकीचे निकष विचारात घेऊन ठेवीदारांची रक्कम आवश्यकतेप्रमाणे ठेवीदारांना त्वरीत परत करता यावी या उद्देशाने अहवाल सालात संस्थेने एकूण ₹ 72,29,09,593.15 एवढी गुंतवणूक विविध बँकेत केलेली आहे.

**ऑडीट वर्ग :-**

संस्थेचे सन 2016-2017 या अहवाल वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण एस. बी. सणस ॲण्ड असोसिएट्स प्रमाणित लेखापरिक्षक यांनी केले. तसेच वैधानिक लेखा परिक्षण श्री. नरेंद्र एस. बर्वे ॲण्ड असोसिएटस्, सनदी लेखापाल यांनी केले असून संस्थेस वैधानिक लेखापरिक्षणाचा 'अ' वर्ग मिळाला आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण 22 सभा झाल्या. या सभांना सर्व संचालक जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होते. प्रत्येक सभेत संस्थेचे हित व प्रगतीचा विचार करून सर्वानुमते निर्णय घेण्यात आले आहेत.

**कार्यक्षेत्र :-**

संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई, ठाणे, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा जिल्ह्यापुरते मर्यादित आहे.

**आधुनिक तंत्रज्ञान/संगणकीकरण :-**

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाचे नवे तंत्रज्ञानाचे वाढते महत्व लक्षात घेऊन आपल्या संस्थेने कोअर बँकिंग सेवा सुरू केली असून सभासदांना कोणत्याही शाखेतून आर्थिक व्यवहार करता येतील. यामुळे सभासदांना संगणकाद्वारे ''ई'' सेवा मिळणार आहे. संस्थेच्या खातेदारांना तत्पर, अचूक व अद्यावत माहिती उपलब्ध होत आहे, तसेच एस.एम.एस. द्वारे संस्थेने ठेवीदार यांच्या ठेवी जमा झाल्यास अथवा काढल्यास त्वरीत माहिती उपलब्ध करून दिली जात आहे. तर कर्जाचा हप्ता वेळेवर न भरल्यास तसे एस.एम.एस. द्वारे कळविले जाते. परिणामी आधुनिक तंत्रज्ञान सेवेमुळे सभासदांचा संस्थेवरील विश्वास दृढ होत आहे.

**कर्मचारी वर्ग :-**

संस्थेतील अंतर्गत कामकाजाची पूर्तता करण्याकरीता वरिष्ठ अधिकारी, विभागीय अधिकारी, शाखाधिकारी व वरिष्ठ लिपिक, वसुली अधिकारी, रोखपाल, लिपिक, शिपाई असे एकूण 84 कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार कामाची विभागणी करून जबाबदारी देण्यात आल्यामुळे संस्थेच्या अंतर्गत कामकाजाचा दर्जा उंचावला आहे.

**ठेव संकलन प्रतिनिधी :-**

संस्थेचा प्रचार हा ठेव संकलन प्रतिनिधीद्वारे होत असतो व घरपोच सेवा देण्याचे काम ते करतात. अहवाल सालात संस्थेच्या विविध शाखेत 127 दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेच्या ठेवी वाढविण्यामध्ये व संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**संचालक व त्यांचे नातेवाईक कर्ज तपशिल :**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 75 (2) नुसार संचालक आणि त्यांच्या नातलगांच्या नांवे ₹ 60,77,905.00 कर्ज शिल्लक असून 31 मार्च 2017 अखेर संचालक अथवा नातेवाईक यांची कर्जे थकित नाहीत.

**कर्ज वसुली अधिकार :**

मा. अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी संस्थेचे मुख्य व्यवस्थापक श्री. हरी पाटील, मुख्य वसुली अधिकारी श्री. नंदकुमार पाटील, शाखाधिकारी श्री. शशिकांत पाटील व शाखाधिकारी श्री. तुकाराम खामकर यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 156 च नियम 107 नुसार, वसुली अधिकाऱ्याचे अधिकार प्रदान केले आहेत. ज्या कर्जदारांवर कोर्ट कारवाई करून वसुली दाखला घेण्यात आलेला आहे. त्या सभासदांनी आपले थकीत कर्ज भरावे अन्यथा आपल्यावर जप्ती, पगारकपात इ. कायदेशीर कारवाई होऊ शकते. याबाबत आपल्या काही अडचणी असल्यास कार्यालयात हजर राहून अधिकारी अथवा संचालक मंडळा समोर चर्चा करावी ही विनंती.

**सभासद ठेवी :**

संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम ठेवण्यासाठी संस्था वेगवेगळे उपक्रम राबवित असते. यामुळे अहवाल सालात ठेवीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. संस्थेकडे अहवाल वर्षाअखेर विविध ठेव खात्यामध्ये रक्कम ₹ 141.85 कोटी शिल्लक होती. अहवाल वर्षात ₹ 265.66 कोटी ठेवी पोटी जमा झाले असून मुदत संपल्यानंतर सभासदांना ₹ 254.83 कोटी च्या ठेवी परत केल्या असून अहवाल वर्षाअखेर ₹ 152.68 कोटी ठेवी शिल्लक आहेत. नोटाबंदी होऊनही गतवर्षाच्या तुलनेत अहवाल सालामध्ये ठेवीमध्ये 7.63% वाढ झालेली आहे.

**✻ ठेव प्रगती तक्ता (तुलनात्मक आकडेवारी ) ✻**

(₹. कोटीत)

| अ. क्र. | ठेवीचा प्रकार | 31 मार्च 2016 अखेर शिल्लक जमा | अहवाल वर्षातील जमा | अहवाल वर्षातील परत दिलेली रक्कम | 31 मार्च 2017 अखेर शिल्लक | ठेवीमध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बचत ठेव | 7,94 | 118.68 | 117.27 | 9.35 | 17.76 |
| 2 | मुदत ठेव | 26.9 | 34.45 | 26.64 | 34.71 | 29.03 |
| 3 | दामदुप्पट ठेव | 12.09 | 4.45 | 3.96 | 12.58 | 4.05 |
| 4 | आवर्त ठेवी | 0.65 | 1.53 | 0.80 | 1.38 | 112.31 |
| 5 | सक्तीची बचत ठेव | 0.83 | 0.61 | 0.23 | 1.21 | 45.78 |
| 6 | लखपती ठेव | 0.38 | 0.16 | 0.11 | 0.43 | 13.16 |
| 7 | त्रिमुर्ती दैनंदिन ठेव | 22.11 | 61.33 | 61.16 | 22.28 | 0.77 |
| 8 | दाम तिप्पट ठेव | 0.30 | 0.10 | 0.03 | 0.37 | 23.33 |
| 9 | मासिक लखपती ठेव | 0.73 | 0.75 | 0.50 | 0.98 | 34.25 |
| 10 | दाम चौपट ठेव | 3.28 | 0.87 | 0.61 | 3.54 | 7.93 |
| 11 | मासिक व्याज परतावा | 17.47 | 6.85 | 4.19 | 20.13 | 15.23 |
| 12 | दैनंदिन प्रतिनिधी ठेव | 0.89 | 0.28 | 0.00 | 1.17 | 31.46 |
| 13 | दिपलक्ष्मी ठेव | 25.00 | 8.51 | 15.25 | 18.26 | -26.96 |
| 14 | मंगलमुर्ती ठेव | 5.44 | 3.40 | 3.40 | 5.44 | 0.00 |
| 15 | महालक्ष्मी ठेव | 9.68 | 6.98 | 5.47 | 11.19 | 15.60 |
| 16 | वसंतपंचमी ठेव | 2.61 | 3.10 | 1.61 | 4.10 | 57.60 |
| 17 | संचय ठेव | 0.04 | 0.18 | 0.10 | 0.12 | 57.09 |
| 18 | कॉल ठेव | 5.51 | 13.43 | 13.50 | 5.44 | 200.00 |
| | एकूण | 141.85 | 265.66 | 254.83 | 152.68 | 7.63 |

**कर्ज तपशील :-**

वित्तीय संस्थांमधील वाढत्या स्पर्धेमुळे आर्थिक व्यवहार करण्यासाठी सभासदांसमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने सभासद राजा आहे. परिणामी कर्जाची मागणी दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. तथापि सभासदांच्या अधिकाधिक आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने संस्थेने विविध कर्ज योजना सुरू केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ बहुसंख्य सभासदांनी घेतला आहे.

मागील वर्षाअखेर संस्थेकडे एकूण ₹ 112.04 कोटी कर्ज येणे शिल्लक होते. अहवाल वर्षात संस्थेने ₹ 79.94 कोटी कर्ज वाटप केले. अहवाल वर्षात ₹ 61.43 कोटी कर्ज वसूल झाले आहे. अहवाल वर्षाअखेर सभासदाकडून ₹ 130.55 कोटी कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये येणे कर्जामध्ये 16.52% वाढ झालेली आहे.

## ※ कर्ज तपशील तक्ता (तुलनात्मक आकडेवारी) ※

(₹. कोटीत)

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार | 31 मार्च 2016 अखेर शिल्लक | अहवाल वर्षातील कर्ज वसुल | अहवाल वर्षातील कर्ज वाटप | 31 मार्च 2017 अखेर कर्ज शिल्लक | कर्जामध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | वैयक्तिक कर्ज | 5.07 | 2.19 | 4.18 | 7.06 | 39.25 |
| 2. | वाहन तारण कर्ज | 0.78 | 0.31 | 0.21 | 0.68 | -12.82 |
| 3. | ठेव तारण कर्ज | 0.02 | 0.02 | 0.00 | 0.00 | -100.00 |
| 4. | दिर्घ मुदत कर्ज | 65.45 | 14.19 | 27.92 | 79.18 | 20.98 |
| 5. | तात्काळ कर्ज | 0.03 | 0.04 | 0.04 | 0.03 | 0.00 |
| 6. | इतर तारण कर्ज | 1.42 | 0.60 | 0.11 | 0.93 | -34.51 |
| 7. | त्रिमुर्ती दैनंदिन कर्ज | 2.68 | 15.00 | 14.69 | 2.37 | -11.57 |
| 8. | सोने तारण कर्ज | 4.63 | 6.54 | 5.09 | 3.18 | -31.32 |
| 9. | कर्म. गृह तारण कर्ज | 3.53 | 058 | 0.44 | 3.39 | -3.97 |
| 10. | कर्मचारी कर्ज (शैक्षणिक) | 0 | 0.00 | 0.03 | 0.03 | 0.00 |
| 11. | कर्म. वाहन तारण कर्ज | 0.05 | 0.02 | 0.01 | 0.04 | -20.00 |
| 12. | गृहतारण कर्ज | 17.62 | 3.45 | 8.35 | 22.52 | 27.81 |
| 13. | दामदुप्पट ठेव कर्ज | 1.25 | 2.49 | 2.68 | 1.44 | 15.20 |
| 14. | मुदत ठेव कर्ज | 1.23 | 2.88 | 2.51 | 0.86 | -30.08 |
| 15. | लखपती ठेव कर्ज | 0.04 | 0.03 | 0.04 | 0.05 | 25.00 |
| 16. | दामतिप्पट ठेव कर्ज | 0.05 | 0.02 | 0.01 | 0.04 | -20.00 |
| 17. | दामचौपट ठेव कर्ज | 0.72 | 1.17 | 1.05 | 0.60 | -16.67 |
| 18. | दिपलक्ष्मी ठेव कर्ज | 1.49 | 3.10 | 2.23 | 0.62 | -58.39 |
| 19. | मा. व्याज परतावा कर्ज | 1.24 | 2.66 | 2.33 | 0.91 | -26.61 |
| 20. | मंगलमुर्ती ठेव कर्ज | 0.23 | 0.69 | 0.64 | 0.18 | -21.74 |
| 21. | आवर्त ठेव कर्ज | 0 | 0.01 | 0.01 | 0.00 | 0.00 |
| 22. | महालक्ष्मी ठेव कर्ज | 0.22 | 0.79 | 0.79 | 0.22 | 0.00 |
| 23. | मासिक लखपती ठेव कर्ज | 0 | 0.01 | 0.03 | 0.02 | 0.00 |
| 24. | कॅश क्रेडीट कर्ज | 0.73 | 1.13 | 1.14 | 0.74 | 1.37 |
| 25. | वसंत पंचमी ठेव कर्ज | 0.2 | 0.25 | 0.12 | 0.07 | -65.00 |
| 26. | कॅश क्रेडीट ठेव तारण कर्ज | 0.02 | 0.52 | 0.72 | 0.22 | 1000.00 |
| 27. | महिला बचतगट कर्ज | 3.34 | 2.74 | 4.57 | 5.17 | 54.79 |
| | एकूण | 112.04 | 61.43 | 79.94 | 130.55 | 16.52 |

**नफा विभागणी :**

संस्थेस सन 2016-2017 या वर्षात तरतुदी व खर्च वजा जाता ₹ 1,72,86,877.52 नफा झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा ₹ 64,325.49 मिळून एकूण ₹ 1,73,51,203.01 नफा झालेला आहे. त्याची विभागणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे. त्यास मान्यता मिळावी.

| | |
|---|---|
| राखीव निधी 25% (Reserve Fund) | ₹ 43,37,801.00 |
| लाभांश 10% (Dividend) | ₹ 65,99,844.00 |
| इमारत निधी (Building Fund) | ₹ 50,00,000.00 |
| धर्मादाय निधी (Charity Fund) | ₹ 75,000.00 |
| शिक्षण उत्तेजनार्थ निधी (Education Dev. Fund) | ₹ 3,00,000.00 |
| थकीत कर्ज निधी (Due Loan Fund) | ₹ 2,50,000.00 |
| सभासद कल्याण निधी (Member Welfare Fund) | ₹ 3,25,000.00 |
| लाभांश समिकरण निधी (Dividend Equilasation Fund) | ₹ 4,00,000.00 |
| क्रिडा व सांस्कृतिक निधी (Sports & Activity Fund) | ₹ 55,000.00 |
| पुढील वर्षाकरीता शिल्लक (Next Year Balance) | ₹ 8,558.01 |
| एकूण (TOTAL) | ₹ 1,73,51,203.01 |

## हार्दिक अभिनंदन !



1) **मा. श्री. सर्जेराव पाटील** यांची जिल्हा परिषद कोल्हापूरच्या बांधकाम सभापती पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

2) **मा. श्री. हंबीरराव पाटील** हे जिल्हा परिषद कोल्हापूर निवडणुकीमध्ये विजयी झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

3) **मा. श्री. सत्यजीत देशमुख** हे जिल्हा परिषद सांगली निवडणुकीमध्ये विजयी झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

4) **मा. श्री. दिलीप पाटील** यांची पंचायत समिती शाहुवाडीच्या उपसभापती म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन

5) **मा. श्री. अमर पाटील** हे पंचायत समिती शिराळा निवडणुकीमध्ये विजयी झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

6) दत्तसेवा परिवार संचलित दत्तसेवा विद्यालय, तुरूकवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील **इ. 10 वी चा** व **इ. 12 वी चा निकाल 100%** लागला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन.

संचालक मंडळ/कर्मचारी वृंद




ा वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षीय भाषण
रताना मा. अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे.



29 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेले विधान परिषद आमदार मा. श्री. प्रविणभाऊ दरेकर यांचा सत्कार करताना मा. श्री. आनंदराव माईंगडे व इतर मान्यवर.



कुसुमाग्रज प्रतिष्ठान व महाराष्ट्र शासन संचलित 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेचा मुख्य कार्यालयात शुभारंभ करताना संस्थेचे संचालक व कर्मचारी.



सन २०१७ सालच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना सर्वोदय को-ऑप. बँकेचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक सोबत संस्थेचे अध्यक्ष आनंदराव माईंगडे, उपाध्यक्ष गोपीनाथ राणे.



दत्तसेवा पतपेढी आयोजित कबड्डी स्पर्धेचा शुभारंभ करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे व कबड्डी स्पर्धेतील विजयी संघ.




दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व दिंडीची क्षणचित्रे.



मा. राज्य संघ पुणे व संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या सभासद व कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमात उपस्थित असलेले मा. श्री. जे. डी. पाटील, उपनिबंधक सहकारी संस्था पी-विभाग यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष सोबत श्री. आशुतोष सामंत.



कोल्हापूर सहकारी बोर्ड व संस्थेच्या वतीने आयोजित सहकारी संस्थांचा मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना मा. श्री. भैय्यासाहेब पाटील (संचालक-के.डी.सी.सी. बँक व जि. प. सदस्य-कोल्हापूर)



बँको या अग्रगण्य शैक्षणिक संस्थेकडून सन २०१६ चा बँको पुरस्कार स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे, उपमुख्यव्यवस्थापक सौ. अर्चनाताई माईंगडे व बँकोचे पदाधिकारी.



संस्थेच्या वतीने मौजे तुरुकवाडी (कोल्हापूर) येथे राबविण्यात आलेल्या वृक्षारोपन कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे कर्मचारी.



संस्थेच्या वतीने गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटप करताना ॲड. सतिश माईंगडे सोबत मा. श्री. जे. एस. पोतदार सर व इतर मान्यवर.




कबड्डी स्पर्धेचा उद्घाटन समारंभाकरिता उपस्थित मा. श्री. सत्यजित देशमुख, जि. प. सदस्य-सांगली, सोबत संस्थेचे अध्यक्ष व इतर मान्यवर.

बुक-पोस्ट

सभासद क्र.

प्रेषक,
**दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई.**
1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड, मालवणी,
अग्निशमन केंद्रासमोर, मालाड पश्चिम, मुंबई - 95.
दुरध्वनी : 8108160113/8108160101
Email : dattasevapatpedhi@gmail.com
Website : www.dattaseva.com

प्रति,
श्री./श्रीमती ______________________

______________________

______________________

युनिटी प्रिंटींग प्रेस - २३७०१९५१ / ९८७०८६०३१४ / ९८७०६१३०८५ Email : unityppnikam@gmail.com